केंद्र शासनाने अधिसूचित केलेल्या मिहान व अन्य विशेष आर्थिक विकासकांना/घटकांना आर्थिक सवलती बिगरशेती करातून सूट देणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्र:एनएए १११९/प्र.क्र.११०/ल-५**
**मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : ९ मार्च, २०१२**

**संदर्भ:-** १. शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. एसईझेड-२०१०/सीआर-५३४/उदयोग-२, दि. १५.१०.२०११
२. राज्य मंत्रीमंडळ बैठकीचे दि. १४.९.२०११ चे कार्यवृत्त.

**प्रस्तावना:** देशामध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास व्हावा, निर्यातीस चालना मिळावी व मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी याकरीता खाजगी क्षेत्राकडून गुंतवणुकीच्या माध्यमातून तसेच सार्वजनिक क्षेत्राद्वारेही पायाभूत सुविधांचा विकास व्हावा आणि विविध निर्यातक्षम उदयोग उभारले जावेत यासाठी केंद्र शासनाच्या विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ३ (१०) मधील तरतुदीनुसार, राज्यातील अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रांचे विकासक तसेच त्यातील घटकांना विविध सवलती देण्याबाबत, राज्य मंत्रीमंडळाच्या दि. १४.९.२०११ च्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन उदयोग, ऊर्जा व कामगार विभागाने संदर्भाधीन क्र. १ वरील दि. १५.१०.२०११ च्या शासन निर्णयान्वये विविध आर्थिक सवलती देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. त्यामधील, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार आकारण्यात येणाऱ्या अकृषिक आकारणीमधून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:** राज्य मंत्रीमंडळाने दि.१४.९.२०११ च्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार, केंद्रशासनाच्या विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ३ (१०) मधील तरतुदीनुसार, राज्यातील अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रांचे विकासक तसेच त्यातील घटक यांना, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार आकारण्यात येणाऱ्या अकृषिक आकारणीमधून खालील अटींच्या अधीन राहून सूट देण्यात येत आहे.

1) केंद्रशासनाने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ अंतर्गत अधिसूचित केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रातील प्रोसेसिंग एरियाच्या संदर्भात विकासकांना व त्यातील घटकांना ज्या ज्या बाबींवर विविध सवलती अनुज्ञेय केलेल्या आहेत/करतील त्या त्या बाबींवर त्या त्या क्षेत्राच्या संदर्भात विकासकांना व त्यातील घटकांना अनुज्ञेय राहील.
2) सदरहू सवलत पुढील २५ वर्षांकरीता किंवा प्रस्तावित महाराष्ट्र विशेष आर्थिक क्षेत्र व नेमून दिलेली क्षेत्र अधिनियम, २०१० हे विधेयक पारित होईल त्यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत लागू होतील.

३) सदरहू सवलत, महाराष्ट्र विशेष आर्थिक क्षेत्र व नेमून दिलेली क्षेत्र अधिनियम, २०१० या विधेयकातील कलम ३ (१०) अन्वये अधिसूचित केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांचे विकासक तसेच त्यातील घटकांना लागू होतील.

२. सदरहू शासन निर्णय हा शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१२०३०९१०२७०९३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(द.ह.कदम)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा. मंत्री व मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५) मा. विधानसभा व विधानपरिषद सदस्य (सर्व)
६) मा. मुख्यसचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई (५ प्रती)
८) विभागीय आयुक्त (सर्व)
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
११) प्रधानसचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
१२) सहसचिव/उपसचिव (सर्व), महसूल व वन विभाग
१३) सर्व अवरसचिव/कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग
१४) निवडनस्ती, ल-५